Shri Siddheshwar Devasthan, Solapur.
Shree Siddheshwar Women's College of Engineering, Solapur.
Approved by AICTE, New Delhi, Recognised by Govt. of Maharashtra & Affiliated to DBATU, Lonere
E-mail: office@sswcoe.edu.in | Website: www.sswcoe.edu.in | Phone 0217- 2627227
T.P.S. II, Final Plot No. 74, Bhawani Peth, Rupa Bhawani Mandir Road, Solapur – 413002 M.S.

दिनांक : ०३/०३/२०२२

# नोटीस

## (विद्यार्थिनींच्या ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाबाबत)

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, मागासवर्गीय (S.C.Category **वगळून**), राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाहभत्ता योजना **(EBC/EWS)** व राज्य अल्पसंख्यांक शिष्यवृती योजना **(Minority)** साठी महाडीबीटी पोर्टलवर (https://mahadbtmahait.gov.in/Login/Login) विविध योजने करिता **ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याकरिता दिनांक ३१/०३/२०२२ व S.C.Category साठी दि. ०७/०३/२०२२ पर्यंत पुनश्च मुदतवाढ दिलेली असून सर्व विद्यार्थीनिनी अंतिम दिनांकापूर्वी अर्ज सादर करावेत** तदनंतर अर्ज केल्यास व शिष्यवृत्ती अर्ज मंजूर न झाल्यास होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. जर विद्यार्थिनी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्यांची संपूर्णतः जबाबदारी त्या-त्या विद्यार्थिनींची राहील ***तसेच महाविद्यालयात प्रवेशित व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity) व आधार लिंक (Adhar link) नसलेल्या विद्यार्थीनींनी याची गंभीरतेने दखल घ्यावे अन्यथा अशा विद्यार्थिनींना संबंधित शैक्षणिक वर्षाचे नियमानुसार पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी. तसेच शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यास काही अडचणी असल्यास त्वरित समन्वयक अथवा ऑफिस मध्ये संपर्क करावा.***

टिप :

१) प्रथम व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना ११ वी/१२ वी किंवा डिप्लोमाचे अभ्यासक्रम पूर्ण करत असताना महाडीबीटी पोर्टलवर आधारबेस्ड (प्रोफाईल) लॉगीन तयार केलेले असतात तदनंतर विद्यार्थिनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नव्याने विविध अभ्यासक्रमाच्या प्रथम अथवा थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता जुनेच नोंदणी (रजिस्ट्रेशन युजर नेम व पासवर्ड) वापरुन ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२) शिष्यवृत्ती साठी अर्ज करताना सर्व विद्यार्थीनींनी त्यांच्या शैक्षणिक व इतर कागदपत्रांची मूळ प्रत पोर्टलवर अपलोड करावे तसेच सदर अर्जाचे प्रत व अनुषांगिक कागदपत्रे छायांकित प्रत महाविद्यालयामध्ये जमा करावीत.

३) शिष्यवृत्तीची रक्कम बँकेच्या खात्यात जमा होण्यासाठी आपल्या खात्याला आधार लिंक असणे गरजेचे आहे तसेच मोबाईल नंबर आधार कार्ड व बँक खात्याशी लिंक असणे अनिवार्य आहे.

४) विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीसाठी पोस्ट खात्याने 'इंडिया पोस्ट पेमेंट बँक - बचत खाते' सुविधा उपलब्ध करून दिलेले असून विद्यार्थीनींनी नजीकच्या पोस्ट ऑफिसला भेट देवून खाते उघडून घ्यावे. (खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रे – मोबाईल क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड (उपलब्ध असल्यास), शिष्यवृत्ती अप्लीकेशन क्रमांक)

(डॉ. टी. ए. चव्हाण)
**प्राचार्य**

प्रत : १) सर्व विभाग प्रमुख व त्यांच्या मार्फत शाखानिहाय विद्यार्थी व्हॉट्सप ग्रुप,
२) समन्वयक शिष्यवृत्ती विभाग - श्री. सतीश सफळे (मो. नं. -९५९५७२७२२८) व
प्रा. रविकांत पाटील (मो. नं. - ७७७४९८१९८९)
३) प्रा. सौ. डी. बी. पारगे, महाविद्यालय वेबसाईट वर प्रकाशित करण्याकरिता,
४) नोटीस बोर्ड ५) शिष्यवृत्ती फाईल.

Scanned with CamScanner